**नियमित दिवाणी मुकदमा नं.३१९/२०२३ – निशाणी १९ लगत आदेश**

प्रतिभा दादासाहेब व्हळगळ वि. मारूती दिगंबर सुतार इ.

CNR No. MHSO20-001229-2023

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व ७ तर्फे दाव्यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी केलेला आहे. सदर प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, सदर प्रतिवादी यांना जुनी महत्वाची कागदपत्रे वेळेत हाती न आलेने प्रतिवादींना कैफियत व म्हणणे मुदतीत देता आले नाही. म्हणणे व कैफियत देणेस प्रतिवादींना सुमारे १ महिन्याचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब सदर प्रतिवादी यांनी जाणुनबूजून केलेला नाही. प्रस्तुतचा दावा स्थावर मिळकतीसंबंधीचा असलेमुळे प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेणे गरजेचे व महत्वाचे आहे. तसे न झालेस सदर प्रतिवादी क्र. १ व ७ यांचे अपरीमित असे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, अर्जातील मजकूर खोटा व बनावट आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचे झालेस रक्कम रु.५००/– कॉस्ट करणेची विनंती केली.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने सदरचा दावा प्रतिवादींचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी, जाहीर ठरावाचा व निरंतर ताकीदीचा दाखल केलेला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी मुदतीमध्ये कैफियत दिलेले नाही ही बाब स्पष्ट आहे. परंतु सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. परंतु

विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च सदर प्रतिवादी क्र. १ व ७ यांचेवर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

## <u>आ दे श</u>

१. प्रतिवादी क्र. १ व ७ यांचा अर्ज (नि.क्र.१९) प्रतिवादी क्र. १ व ७ यांनी वादी यांना रक्कम रु.२००/– (दोनशे रुपये) देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व ७ यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

दिनांक – ०४/०५/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.